# प्रेसनोट

नाशिक,
दि. १०/०३/२०२३

आलोसे क्र १.दौलत नथु समशेर,शिरस्तेदार,आलोसे क्र २.भास्कर प्रकाश राऊत,भुकरमापक दोन्ही नेमणुक - उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय,त्रंबकेश्वर,जि.नाशिक ,आरोपी क्र ३.वैजनाथ नाना पिंपळे खाजगी इसम,मोजणी व बांधकाम व्यवसाय,रा. शांतीनगर,मखमलाबाद,नाशिक यांनी ६,००,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | त्रंबकेश्वर पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे गु.र.नं ७१/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,७ अ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १.दौलत नथु समशेर,शिरस्तेदार,<br>२.भास्कर प्रकाश राऊत,भुकरमापक<br>दोन्ही नेमणुक - उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय,त्रंबकेश्वर,जि.नाशिक<br>३.वैजनाथ नाना पिंपळे खाजगी इसम,मोजणी व बांधकाम व्यवसाय,रा. शांतीनगर,मखमलाबाद,नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ६,००,०००/- रूपये तडजोडअंती ३,००,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | -- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे पत्नीचे नावे असलेल्या मौजे तळेगाव येथील क्षेत्राचे शेजारील क्षेत्राची फायनल लेआऊट करीता मोजणी करतांना तक्रारदार यांचे क्षेत्र सरकु न देण्याचे मोबदल्यात **आलोसे क्र १.दौलत नथु समशेर, शिरस्तेदार, आलोसे क्र २.भास्कर प्रकाश राऊत, भुकरमापक दोन्ही नेमणुक - उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, त्रंबकेश्वर, जि.नाशिक** यांनी **६,००,०००/- रूपये** रक्कमेची तक्रारदार यांचे कडेस लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने सापळापुर्व पडताळणी केली असता पडताळणी कारवाई दरम्यान **आलोसे क्र १.दौलत नथु समशेर, शिरस्तेदार, आलोसे क्र २.भास्कर प्रकाश राऊत, भुकरमापक दोन्ही नेमणुक - उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय,त्रंबकेश्वर,जि. नाशिक** यांनी **१०,००,०००/- रूपये मागणी करून तडजोडअंती ६,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली व त्यानंतर** आलोसे १ व २ यांचे वतीने आरोपी क्र ३ **वैजनाथ नाना पिंपळे खाजगी इसम, मोजणी व बांधकाम व्यवसाय, रा.शांतीनगर, मखमलाबाद, नाशिक यांनी आपले स्वत:चे ऑफीसमध्ये तडजोडअंती ३,००,०००/- रूपये** लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाल्याने तिघांविरुध्द त्रंबकेश्वर पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे गु.र.नं ७१/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,७ अ प्रमाणे दि. १०/०३/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक |
| संकेतस्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | spacbnashik@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२५३-२५७५६२८, २५७८२३० |
| व्हॉट्स ॲपक्र | :- | ९९३०९९७७०० |

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक
सत्यमेव जयते

१०/०३/२३
( नरेंद्र भा. पवार )
पोलीस उपअधीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.